"आयुर्विद्या" एप्रिल-मे १९५४.

गुरुवर्य नानल निबंध स्पर्धा-१९७२ मधील प्रथम क्रमांकाचा निबंध. (रु. २५१/-)

# धातू परिणती

**श्रीकांत यशवंत वाघ** तृतीय वर्ष बी. ए. एम्. अँन्ड एस्.
टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे ११

## धातू म्हणजे काय ?

धातू हे शरीराचे धारण करतात. (धारणात् धातव:) सृष्टीच्या अवलोकनावरून तिचे द्रव्य व शक्ती असे दोन भाग आपणास पाडता येतील. शक्तीला द्रव्याचा आश्रय हा आवश्यक आहे. त्रिदोष ही शक्ती आहे आणि धातू हे द्रव्य आहे. दोष व धातू हे वेगवेगळे राहू शकत नाहीत. 'दूष्य' असे धातूंना दुसरे नाव आहे. (दूष्यन्ते इति दूष्या:) त्रिदोषांकडून ते बिघडविले जातात.

रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा व शुक्र हे सात धातू आहेत. हाच क्रम शरीराचे पोषणाबाबत व धातूंच्या उत्पत्तीबाबत पाळला जातो. प्रत्येक धातूचा एक याप्रमाणे सात धातूंचे सात अग्नि आहेत. प्रत्येक धातूत त्या त्या धातूच्या अग्निकडून पचन चालू असते. या पचनात सार-किट्ट पृथक्करण होते. सारभाग म्हणून पुढचा धातु उत्पन्न होतो प्रीणन, जीवन, लेपन, स्नेहन धारण, अस्थिपूरण व गर्भोत्पत्ती ही या धातूंची अनुक्रमाने कार्ये होत. (अ हृ. सू. ११।४)

## परिणती म्हणजे काय ?

परिणती म्हणजे परिणमन, परिवर्तन, रूपांतर वा अवस्थांतर. धातूचे त्याच्या अग्निने पचन होऊन सार व किट्ट द्रव्ये वेगवेगळी होतात. सारभागापासून पुढचा धातू तयार होतो व किट्ट हे उत्सर्जित केले जाते.

परिणतीमध्ये एका धातूपासून दुसरा धातु उत्पन्न होतो ही गोष्ट महत्वाची आहे. रसादिधातूंचा नित्य क्षय होत असतो. अशित, पीत, लीढ, खादित अशा चतुर्विध आहारापासून-जो आहाररस उत्पन्न होतो, तोच हा क्षय भरून काढतो. त्यामुळे धातूंचे स्वास्थ्य कायम रहाते. आहारजनित धातू हाच धातूंचा आहार आहे.

ही जी परिणती होते, त्यासाठी तो धातू निर्माण करणारे स्त्रोतस, धात्वग्नि आणि पूर्वधातू ह्या गोष्टी आवश्यक आहेत. प्रत्येक धातूचा अग्नि हा स्वतंत्र आहे आणि पूर्वधातू नियत आहे. तो धातु उत्पन्न होण्यासाठी स्वतंत्र स्त्रोतसाचे अस्तित्व आयुर्वेदाने मानले आहे.

आहाररस हा धमन्यात अधिष्ठित आहे. आंत्राशयात आहाराचा पाक होऊन हा सारभाग धमनींद्वारे शरीरात पोहोचतो. रसाचे स्थान हृदय आहे. व्यानवायूच्या सहाय्याने त्याचे एकसारखे विक्षेपण होत असते. आप्य रसावर यकृतप्लीहांमध्ये रंजकपित्ताची क्रिया होऊन त्यास रक्तवर्ण येतो. आचार्यांनी बहुतेक सर्व धातूंच्या उत्पत्तीसाठी एका स्वतंत्र कलेचे आणि स्वतंत्र स्त्रोतसाचे अस्तित्व मानले आहे. धातूच्या उत्पत्तीचे स्थान म्हणजे त्याचे स्त्रोतस् आणि उत्पत्तीचे साधन म्हणजे त्याची कला होय.

## परिणतीतील कार्यकारी द्रव्ये

शरीरातील वात, पित्त, कफ या शक्ती धातुपरिणतीत सहाय्यकारी होतात. व्यानवायु आणि पित्ताश्रित अग्नि यांच्या क्रियांची आवश्यकता तर स्पष्टच आहे. या व्यवहारात कफाच्या उदककर्माचीही नितांत आवश्यकता आहे. क्लेदक कफ हा जरी आमाशयस्थ असला तरी सर्व श्लेष्मस्थाने आणि शरीर यांचेवर तो आपल्या उदककर्माने अनुग्रह करतो. याप्रमाणे परिणतीत व्यानवायु, पाचक पित्त व क्लेदक कफ यांची कार्ये आवश्यक आहेत. परंतु या क्रिया सूक्ष्म असल्याने त्या दृग्गोचर होत नाहीत.

पचनासाठी आवश्यक म्हणून जी द्रव्ये (Enzymes) अर्वाचीनांनी सांगितली आहेत त्यांचा येथे उल्लेख करणे आवश्यक आहे. ही द्रव्ये ज्याप्रमाणे पचनाच्या वेगवेगळ्या अवस्थांमध्ये सहाय्यकारी होतात, तद्वतच

धातुपरिणतीत त्रिदोषांचे कार्य आहे. उदा. Succus Entericus हे पाचक पित्तस्वरूप आहे.

## धात्वग्नि

रसादिधातूमध्ये संश्रित केलेल्या जठराग्निच्या अंशांना धात्वग्नि असे म्हणतात. ज्या त्या धातूचा अग्नि त्या त्या धातूचा आश्रय करून रहातो. जाठराग्निपाचित आहाररस सप्तधात्वग्निकडून पुन्हा पचविला जातो. मल, स्थूल आणि अणु याप्रमाणे धातूंचे तीन भाग या पचनात निर्माण होतात. रसधात्वग्निने आहाररसाचे पचन झाले म्हणजे कफ हा मल, रसधातु हा स्थूलभाग आणि रक्त हा अणुभाग म्हणून उत्पन्न होतो. अणुस्वरूप जे रक्त उत्पन्न होते त्याचे रक्ताग्नीने पचन होऊन पित्त हा मल, रक्तधातु हा स्थूलभाग व मांसधातु हा सूक्ष्मभाग हे उत्पन्न होतात. सूक्ष्म मांसधातुचे स्वाग्निने पचन होऊन कान, नाक, इ. चे ठिकाणचा मल, मांसधातु हा स्थूलभाग आणि मेद हा अणुभाग (सूक्ष्मभाग) याप्रमाणे उत्पत्ती होते. मेदाचे त्याच्या अग्निने पचन होऊन स्वेद, मेदधातु आणि अस्थिधातु हे उत्पन्न होतात. सूक्ष्मास्थिचे अस्थ्याग्निने पचन होऊन केश, लोभ, श्मश्रू (मल), अस्थि (स्थूलभाग) व मज्जाधातू (सूक्ष्मधातु) हे निर्माण होतात. सूक्ष्म मज्जेच्या स्वाग्निने होणाऱ्या पचनात डोळे, त्वचा इ. ठिकाणचा स्नेह, मज्जाधातु व शुक्र हे निष्पन्न होतात. सूक्ष्मशुक्राचे स्वाग्निने पचन होते. शुक्र हा प्रसादतम धातु असल्याने त्यापासून मलोत्पत्ती होत नाही. (काहीजण ओजास शुक्रमल मानतात) सूक्ष्मशुक्रापासून स्थूलशुक्र उत्पन्न होते.

वरील विवरणातील अणुरूप धातूस अस्थायी धातु असेही नाव आहे. हा धातू पूर्वधातूपासून परिणत झालेला असून त्यास पोषकधातु असेही नाव आहे. स्थूलभाग हा स्थायी असतो. त्यास पोष्यधातु म्हणतात. स्थायी आणि अस्थायी यांच्या स्वरूपात व स्थानात लक्षणीय असा फरक नाही. अस्थायी धातूच स्वाग्निने पाचित होऊन स्थायी होतो. अणुस्थूल असा धातुभेद वाग्भटाने सांगितलेला नाही. कारण त्यांचे बहुतांशी एकजातीयत्व आहे. प्रसादभूत रसादिधातूंपासूनच स्वाग्निपचनानंतर रजःस्तन्यादि उपधातु उत्पन्न होतात.

आणखीही एका प्रकाराने धातूंचे भेद पाडता येतील. धातूचा एक भाग हा स्थिर असतो. यालाच पाश्चात्यांनी Elementary Tissue असे म्हटले आहे. धातू हा जसा आपणास दिसतो तसा उत्पन्न करण्याचे कार्य हा स्थिर भाग करतो. धातूंच्या या भेदामध्ये पहिला जो भाग आहे तो स्थिर आहे. परंतु तो दृश्य नव्हे. (सूक्ष्मत्वामुळे) दुसरा भाग हा दृश्य आहे. पहिला भाग दुसऱ्या भागाची उत्पत्ती करतो आणि दुसरा भाग त्या धातूची शारीरकार्ये चालवितो.

एका धातूपासून दुसऱ्या धातूची उत्पत्ती होते असे म्हटल्यानंतर उत्तरधातु पुष्ट असण्यासाठी पूर्वधातु बलवान हवा हे उघडच आहे. पूर्वधातु विकृत असेल तर उत्तरधातुही विकृत उत्पन्न होणार हे सहज समजणारे आहे.

## परिणतीकाल

या विषयी आचार्यांत पुष्कळशी मतभिन्नता दिसून येते. काहींच्या मतानुसार २४ तासात रस शुक्रत्वाप्रत जातो. काहींच्या मते सहावे दिवशी तर काहींच्या मते ३० दिवसांनी रसास शुक्रत्व प्राप्त होते. पाराशर ऋषींनी म्दटल्याप्रमाणे आज घेतलेल्या आहारापासून आठव्या दिवशी शुक्रधातु उत्पन्न होतो. दुसऱ्या दिवशी रस, ३ ऱ्या दिवशी रक्त, ४ थ्या दिवशी मांस—याप्रमाणे आठव्या दिवशी शुक्र उत्पन्न होते. पथ्यकारक वा अपथ्यकारक आहारामुळे येणेप्रमाणे सातवे दिवशी धातुशुद्धी वा धातुदुष्टी आढळून येते.

तस्माद्धि पथ्यापथ्याभ्यामाहाराभ्यां नृणां ध्रुवम्।
सप्तरात्रेण शुध्यन्ति प्रदुप्यन्ति च धातवः॥
पाराशरटीका अ. हृ. शा. ३।६६

सुश्रुताने रसधातु एकेका धातूत ३०१५ कला (पाच दिवस) एवढा कालपर्यंत रहातो असे म्हटले आहे. याप्रमाणे ३० दिवसांनी (१८०९० कला) शुक्र धातु परिणत होतो. चरकांनी मात्र

संतत्या भोज्य धातूना परिवृत्तिस्तु चक्रवत्।
च. चि. १५।२१

असे म्हणून प्रत्येक धातुसाठी विशिष्ट परिणतीकाल असतो ही गोष्ट अमान्य केली आहे. विहिरीवर पाणी काढण्यासाठी रहाटगाडगे बसविलेले असते. ते सातत्यानें फिरत असते व त्यामुळे सातत्याने पाणी वर येत असते. रहाटगाडगे वेगाने फिरविल्यास पाणी वेगाने वर येते व वेग कमी केल्यास पाण्याचा उपसा थोडा थोडा होतो. याचप्रमाणे प्रत्येक धातूची उत्पत्ती ही सातत्याने चालू

असते. अग्निसौष्ठव व अग्निवैगुण्य यामुळे धातू लवकर अथवा उशीरा उत्पन्न होतात. तसेच व्यक्तीच्या गरजेवरही धातूत्पत्ती अवलंबून असते. एखाद्याच्या शरीरात एखादा धातु क्षीण झाला असेल तर रसधातूचा पुष्कळसा भाग हा क्षय भरून काढण्यास खर्ची पडतो. व्यवायाचा परिणाम म्हणून शुक्रक्षय झाला असेल तर दुग्धादि पदार्थांचे सेवन केले असता तत्काळ शुक्रवृद्धी दिसून येते.

परिणतीकाल हा व्यक्तीच्या अग्नीवर पुष्कळसा अवलंबून असतो. रहाटगाडगे चालविणाऱ्याच्या बाहुबलाप्रमाणे अग्नि हा आहे. बाहुबलाच्या कमीअधिक पणामुळे हळूहळू वा भरभर पाणी उपसले जाते. तसेच धात्वग्निच्या कमीअधिक बलामुळे रसधातुपासून तो तो धातु परिणत होण्याच्या कालात भिन्नता आढळते. अग्नि मंद असेल तर जास्तीत जास्त एक महिन्यात रसापासून शुक्र बनते. अग्नि मध्यमबल असेल तर एकेका धातुच्या उत्पत्तीस एकेक दिवस याप्रमाणे सात दिवसात (रसधातूच्या उत्पत्तीचा पहिला दिवस न मोजल्यास सहा दिवसात) रसापासून शुक्र परिणत होते. अग्नि अधिक शक्तिमान असेल तर एका दिवसातच सातही धातु परिणत होतात. चक्रदत्ताच्या म्हणण्याप्रमाणे चरकांनी प्रतिपादिलेली चक्रवत् परिवृत्ती ही सुश्रुतांनी शब्द-जल-अर्चि-संतान या रसविक्षेपणात मान्य केलेली आहे. जलसंतान दृष्टांताने चिरोत्पत्ती (१ महिन्याने शुक्रोत्पत्ती; अर्चिःसंतान दृष्टांताने शीघ्रोत्पत्ती (१ दिवसात) व शब्दसंतान दृष्टांताने नातिशीघ्र नातिमंद उत्पत्ती (१ आठवड्यात) मान्य केलेली आहे. थोडेसे विषयांतर करून कै. वै. गंगाधरशास्त्री यांचे मत मांडतो. त्यांच्या मते शब्दसंतानाने हृदयाचे ध्वनिसातत्य (नाडीचे ठोके) अर्चिःसंतानाने शरीराची उष्णता आणि जलसंतानाने सिरातून वहाणारा प्रवाह निर्दशित केला आहे.

चरकाचार्यांनी प्रतिपादिलेली अविश्रांत धातूत्पत्ती आणि अन्य काही आचार्यांनी मांडलेली विशिष्ट धातूची उत्पत्ती या दोन विचारांची काही अंशी सांगड घालणे शक्य आहे. आपण आज घेतलेल्या आहाराचे आठवे दिवशी शुक्रधातूत परिणमन होते. उद्या घेतलेल्या आहाराचे नवव्या दिवशी तर परवा घेऊ त्या आहाराचे दहाव्या दिवशी शुक्रधातूत परिणमन होईल. याप्रमाणे आठवे दिवसापासून नोंदी घेण्यास सुरुवात केल्यास रोज प्रत्येक धातूची निर्मिती होते असे आढळून येईल. याप्रमाणे धातूंची सातत्याने उत्पत्ती होत असते असे जरी दिसत असले तरी आता जो शुक्रधातु उत्पन्न होत आहे तो आठ दिवसापूर्वी घेतलेल्या आहारापासून उत्पन्न होत आहे असें म्हणता येईल. अशा प्रकारे विचार केला असता चरकाचार्यांच्या चक्रवत् परिवृत्तीतही विशिष्ट कालानंतर विशिष्ट धातूची उत्पत्ती अंतर्भूत आहे असे दिसून येईल.

### उत्पत्तीक्रम

परिणतीकालाविषयी जरी मतभिन्नता असली तरी रसानंतर रक्त, रक्तानंतर मांस हा क्रम सर्वमान्य आहे. सुश्रुताच्या मतापेक्षा एखाद दुसरा दिवस कमी अधिक किंवा पाराशराच्या म्हणण्यापेक्षा दोनचार तास जास्ती कमी लागले तरी परिवर्तनाच्या क्रमात बदल मानण्यास कोणीही तयार नाही.

धातूनां शोणितादीनां गुरुं विद्याधयोत्तरम् । च. सू. २७–३३४.


याचे कारणही अगदी उघड आहे. गुरु, गुरुतर, गुरुतम अशा गोष्टींचा पाक होण्यास जास्तजास्त काल लागतो. रक्तादि सप्तधातू हे पूर्वधातूपेक्षा उत्तरधातु अधिक गुरु याप्रमाणे गुरुतर असल्याने त्यांच्या पाकालाही अधिकाधिक काल लागतो. रसादि धातूच्या कार्याचे अवलोकन केल्यास तीही अनुक्रमाने अधिकाधिक महत्त्वाची असल्याचे दिसून येईल.

याप्रमाणे आयुर्वेदाचा सर्वतंत्रसिद्धांत आहे की, रसरक्तादि धातूमध्ये एक विशिष्ट क्रम आहे. प्रत्येक धातूत आपल्या पूर्वधातूच्या पुष्टीस प्राधान्य देण्याचा नैसर्गिक स्वभाव आहे. यामुळे प्रथम पूर्वधातूची पुष्टी होते व नंतर उत्तरधातूची. याप्रमाणे रस, रक्त इ. क्रमाने शुक्रापर्यंत धातूंची क्रमशः पुष्टी होत रहाते.

रसाद्रक्तं ततो मांसं मांसान्मेदस्ततो ऽस्थि च ।
अस्थ्नोस्थतो मज्जा ततः शुक्रं शुक्राद्गर्भः प्रसादजः ।
च. चि. १५।१४.

रसाद्रक्तं ततो मांसं मांसान्मेदः प्रजायते ।
मेदसो ऽस्थि ततो मज्जा मज्ज्ञः शुक्रं तु जायते ।
सु. सू. १४।१०.

सर्वांची पुष्टी रसापासून होते. 'सामान्यतः' पूर्वोत्पन्न धातूची पुष्टी होते, त्या पुष्टित रसाचा उपयोग होतो व त्यानंतरच उत्तरउत्तर धातू उरलेल्या रसापासुन आपापल्या पुष्टीसाठी सामग्रीग्रहण करतात. 'सामान्यतः




**संतत्या भोज्यधातूनां परिवृत्तिस्तु चक्रवत् । च. चि. १५।२१**

हा शब्द अशासाठी वापरला की, काही कारणामुळे एखाद्या धातुविशेषाचा क्षय झाला तर प्रथम त्या धातूच्या विशेष पोषणासाठी रसाचा विनियोग केला जातो. रसाद्वारा प्रत्येक धातूची पुष्टी आपापल्या अग्निच्या सहाय्याने होते, याबाबतीत मात्र आचार्यात एकमत आहे.

रोगांच्या विचारातही आयुर्वेदाने हा क्रम मान्य केला आहे. ' उपेक्षा वा मिथ्या उपचाराने रोग असाध्य होऊन बसतो. ' असे जे म्हटले आहे त्यावरून याचेच दर्शन होते. याचे कारण असे की, रोग कालांतराने उत्तरोत्तर धातूंमध्ये प्रविष्ट होत रहातो.

क्रमेणोपचयं प्राप्य धातूननुगतः शनैः ।
न शक्यं उन्मुलयितुं वृक्षो इवामयः ॥सु.सू.२३।१५

सर्प विषाच्या प्रकरणातही असे मानले गेले आहे की उपेक्षा किंवा मिथ्या उपचारामुळे विष क्रमाक्रमाने दोन धातूंमध्ये असलेल्या कलेत प्रविष्ट होत जाते व या प्रकारे सर्पविषाचे सात वेग वा अवस्था असतात.

धातूंच्या क्रमाचा विचार चिकित्सेतही होतो. जसे, ज्वरात लंघनामुळे पूर्वपूर्व धातू निराम होऊन शेवटी रसधातु निराम होतो. यासाठी जास्तीतजास्त सात दिवस पुरेसे होतात. ज्वर, कुष्ठ, विषवेगादीमध्ये आश्रयभूत धातूच्या भेदामुळे बाह्याभ्यन्तर उपचारातही भिन्नता येते.

याप्रकारे धातूंची क्रमविशेष पुष्टी आणि प्रत्येकाच्या पुष्टीमध्ये स्व. स्व. अग्नि कारण असणे या दोन गोष्टी सर्वमान्य असल्या तरी त्यांची योग्य संगती लावण्यासाठी

टीकाकारांनी तीन चार पक्ष उपस्थित केले आहेत. च. सू. २८।४ तसेच च. चि. १५।१६।१७ यावरील चक्रपाणीकृत आयुर्वेददीपिकेतील टीकेत, याशिवाय चरकावरील गंगाधराच्या टीकेत, तसेच सु. सू. १४।१० वरील डल्हणाच्या निबंधसंग्रह व्याख्येत आणि शिवदास टीकेत या मतांचे निरुपण केले आहे. धातूपरिणतीचा अभ्यास करीत असतांना ही सर्व मते साकल्याने विचारात घेणे क्रमप्राप्त आहे. या मतांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल—

(१) पोषक धातूपासून–
 (अ) पूर्वधातूपासून उत्तरधातूचे पोषण–– क्रमपरिणाम पक्ष.
 (आ) रसधातूपासून सर्व धातूंचे पोषण–– केदारीकुल्यान्याय.
(२) युगपत् वा क्रमशः –
 (अ) युगपत्–एककालिक–सर्व धातूंचे पोषण.
 (आ) क्रमशः सर्व धातूंचे पोषण.
(३) सर्वांशापासून वा अंशांशापासून—
 (अ) पोषकधातूच्या सर्वांशापासून पोषण— सर्वांश परिणाम.
 (आ) पोषकधातूच्या अंशापासून पोषण–– अंशांश परिणाम.

## क्षीरदधिन्याय वा क्रमपरिणाम पक्ष

दूध विरजल्यावर त्यापासून दही बनते. दही घुसळल्यावर त्यापासून ताक वेगळे होऊन नवनीत तयार होते. नवनीतापासून सारस्वरूप धृत हे उत्पन्न होते. दुधापासून जसे धृत तयार होते तद्वत् आहाररसापासून शरीरात शुक्रधातु तयार होतो. आहाररस हा प्रथम रसधातूचे पोषण करतो. स्वतःच्या अग्नीने पचन झाले म्हणजे रस रक्ततेप्रत जातो. रक्तापासून मांस, मांसापासून मेद, मेदापासून अस्थि, अस्थिधातूपासून मज्जा व मज्जेपासून शुक्र स्वतःच्या अग्नीने पचन होऊन उत्पन्न होतात. अशा तऱ्हेने पूर्वपूर्व धातुपरिणामातून उत्तरोत्तर धातू उत्पन्न होतात.

या न्यायास क्षीरदधिन्याय अथवा क्रमपरिणामपक्ष असे म्हटले आहे. या न्यायात दोन कल्पना अंतर्भूत आहेत.

(अ) क्रमपरिणति– क्रमाने परिणमन जसे, रसानंतर रक्त, इ.

(आ) सर्वात्मपरिणाम– सर्वच्या सर्व पूर्वधातूचे उत्तरधातूत परिणमन. क्षीर हे सर्वात्मना दही बनते. रसही सर्वस्वी रक्ततेप्रत जातो.


'पुष्यन्ति आहाररसात्–' या वचनात चरकांनी रसाने रसपोषण की रक्तपोषण सांगितले आहे अशी शंका उत्पन्न होणे शक्य आहे. यास उत्तर असे की, एकच आहाररस हा मार्गभेदाने पोष्य व पोषक अशा दोन स्वरूपांचा आहे. अन्नापासून उत्पन्न होणारा पोषक रस म्हणजे आहाररस. स्थायी व पोष्य अशा रसाचे स्थान हृदय हे आहे. 'रसाद्रक्तं' या वचनात अभेदामुळे रसाचा उल्लेख केलेला नाही. पोष्य रसधातु नाही म्हणून केला नाही असे नव्हे. तेव्हां शरीरात अष्टधातु असल्याचे कोणी मानू नये. पोषक व स्थायी रसधातूत स्थानभेद व अग्निभेद नाही, म्हणून शरीर हे सप्तधात्वात्मकच आहे. (शिवदास व्याख्या, सु. सू. १४।१०)

## केदारीकुल्यान्याय वा अंशांशपरिणामपक्ष

शेतात असलेल्या विहीरीचे पाणी पाट काढून सर्व शेतभर पुरविले जाते. विहीरीच्या अगदी जवळचा जो पहिला वाफा असेल त्यास पाणी प्रथम मिळते. त्यानंतर उरलेले पाणी हे दुसऱ्या वाफ्याकडे जाऊन त्यास भिजविते. शेष पाणी तिसऱ्या वाफ्याकडे जाते. याप्रमाणे दूर, दूरतर असणाऱ्या वाफ्यांना पाणी अधिकाधिक उशीरा मिळते. तद्वत् रस हा प्रथम रक्ताला भिजवतो. तेथे रक्तस्थ नसंबंधामुळे त्यास रक्तसादृश्य येते. व तो रक्त या संज्ञेस प्राप्त होतो. नंतर तो रस मांसतेप्रत जाऊन मांससादृश्य अनुभवतो आणि मांससदृश अंशाने मांसपोषण करतो. याचप्रमाणे पुढील धातूंविषयी समजावे. अशा तऱ्हेने रक्तापासून पुढच्या धातूंना रस हा स्वतःच प्राप्त होतो.

या न्यायास केदारीकुल्यान्याय वा अंशांशपरिणामः पक्ष अशी नावे आहेत. याही न्यायाच्या अंतर्गत दोन कल्पना असल्याचे दिसून येईल– (अ) क्रमपरिणती– क्रमशः परिणमन आणि (आ) अंशांश परिणाम–जसे, पाटातील सर्व पाणी एकच वाफा भिजवत नाही. पाण्याच्या काही भागापासून पहिल्या वाफ्याचे पोषण होते. शेष पाण्याच्या काही भागापासून पुढच्या वाफ्याचे पोषण होते, तद्वत् रस हा सर्वात्मना रक्ततेप्रत जात नांही. उरलेल्या रसाच्या अंशापासून मांसा-

## केदारी कुल्यान्याय वा अंशांशपरिणामपक्ष





दींचे पोषण होते.

रस हा रक्तस्थानसंबंधाने रक्तसादृश्य व रक्तव्यपदेश अनुभवतो असे म्हणून चक्रपाणीने (सु. सू. १४।१०) हारीताच्या वचनाचा निर्देश केला आहे. हारीताच्या म्हणण्याप्रमाण रसधातूचे पित्तोष्म्यामुळे परिवर्तन होत जाते. असे होत असताना श्वेत, कपोत, हरित, हारिद्र, पद्म, किंशुक आणि आरक्तक अशा संज्ञा दर दिवशी वर्ण बदलत असल्याने प्राप्त होतात. या ठिकाणी अर्वाचीनांनी वर्णिलेल्या तांबडया रक्तपेशींच्या वाढीशी (Development of R. B. C.) संबंध लावत येईल.

### खलेकपोतन्याय वा पृथकपरिणामपक्ष

अन्न घेण्यासाठी कबुतरे लांबलांबून खळयावर येतात. अन्न घेऊन ती आपआपल्या घरटयाकडे परत जातात. ज्या कबुतरांची घरटी जवळ असतात ती स्वस्थानी लवकर पोहोचतात. ज्यांची घरटी दूर आहेत अशी कबुतरे उशीरा पोहोचतात. त्याचप्रमाणे शरीरात वेगवेगळया मार्गांनी जाणारा रसधातु हा रक्तादींकडे लवकर अथवा उशिरा पोहोचतो. एखाद्या धातूच्या पोषक रसभागाचा दुसऱ्या धातूशी कोणत्याही प्रकारे संबंध येत नाही. रक्तादिपोषक स्त्रोतसे ही



उत्तरोत्तर सूक्ष्म व दीर्घ आहेत. (चक्र) रक्तपोषक रसभाग हा रक्तमार्गाने जाऊन रक्ताचे पोषण करतो. मांसपोषक रसभागाला अधिक दूरचा व सूक्ष्ममार्ग अनुसरावा लागतो. त्यामुळे मांसाचे पोषण हे रक्त-धातुनंतर होते. यानंतर मेदादिंचे पोषण अधिकाधिक उशिरा होत जाते. याप्रमाणे एकच रसधातु हा वेग-वेगळ्या मार्गांनी जातो आणि कमीअधिक अंतर असल्याने धातूचे पोषण रस, रक्त आदि क्रमानेच होते.

हा खलेकपोतन्याय वा पृथक्परिणामपक्ष होय. यातही पुन्हा दोन कल्पना अंतर्भूत आहेत. (अ) पृथक्परिणती-रसाच्या अंशापासून रक्तादि धातूंचे वेगवेगळे पोषण होते. जवळ वा लांब असल्याने पोषण चटकन् वा उशीरा होते. आणि क्रम कायम राखला जातो. (आ) एकाच रसधातूपासून धातुपोषण.

आधुनिक प्रत्यक्षानुसार महास्त्रोतसाकडून अथवा हृदयाकडून विभिन्न अवयवाकडे अथवा धातूंकडे पृथक् स्त्रोतसे जात नाहीत. तर हृदयापासून निघून एकच प्रधान धमनी जसजशी पुढेपुढे जात रहाते तसतशा तिला शाखाप्रशाखा फुटून त्या त्या अवयवाकडे जातात. काही प्रारंभिक प्राण्यात अवश्यपणे अशी स्थिती दिसून येते की महास्त्रोतसापासूनच ( Digestive tract ) वेगवेगळी स्रोतसे वेगवेगळ्या अवयवांकडे जातात. उदा० Arthropodia, Crustaceae, Mollusae, इ. वर्गा-च्या प्राण्यात ही गोष्ट आढळून येते. उच्चवर्गाच्या मानवादि प्राण्यांत नव्हे. म्हणून खलेकपोतन्याय हा वरील प्राण्यात दिसून येतो. असे वाटते की, या प्राण्यात प्राचीनांकडून घेतल्या गेलेल्या नोंदी कालवश आपल्याला अर्थरूपात प्राप्त झालेल्या आहेत

## एककालधातु पोषणपक्ष

अरुणदत्ताने आपल्या टीकेत पूर्वपक्षाच्या स्वरूपात या पक्षाचा उल्लेख केला आहे. या पक्षानुसार आहार-रस हा एकाच वेळी सातही धातुमार्गात प्रवेश करतो आणि रसरक्तादि धातु उत्पन्न होतात.

आहाररसादेककालं सप्तसु धातस्रोतःसु प्रवेशिताद्
रसरक्तादयो ।
धातव उत्पद्यन्ते इति एककालधातुपोषणपक्षः ॥
अरुणदत्त, अ. हृ. शा. ३।६२

या पक्षाच्या पुष्ठचर्थ चरकाच्या व्यानवायूच्या प्रेरणेने रसधातू युगपत् सतत शरीरात फेकला जातो (च. चि. १५।१६) या वचनाचा उल्लेख करणे जरू-रीचे आहे. अरुणदत्ताने 'युगपत्' चा अर्थ या ठिकाणी 'क्रम' असाच घेतला आहे. या न्यायाचा अन्य ग्रंथ-कारांनी फारसा कोठे उल्लेख केल्याचे आढळत नाही.

## चतुर्विध न्यायांचे परीक्षण

चरकाच्या शारीरस्थानात शुक्रापासून गर्भोत्पत्ती कशी होते याचे विवेचन करण्यासाठी क्षीरदधिन्याय उदृधृत केला आहे हाच न्याय सर्व धातूंच्या उत्पत्ती-साठीही योग्य आहे असे म्हणून टीकाकारांनी त्याचा प्रपंच मांडला आहे. पूर्वपूर्वधातूंचा उत्तरधातूंशी संपर्क आला असता त्यास उत्तरधातूरूपत्व प्राप्त होते, असा या न्यायाचा आशय आहे. पूर्वी म्हटल्याप्रमाणे सर्वात्म-परिणामाची कल्पना या न्यायात प्रधान आहे. बर्फास उष्णता दिली असता कालांतराने सर्व बर्फाचे पाणी होते. पाण्यास उष्णता देऊन सर्वच्यासर्व पाण्याची वाफ होऊ शकते. याप्रमाणे हा सर्वात्मपरिणाम आहे.

चक्रदत्ताने या न्यायासंबंधी चार दूषणे उपस्थित केली आहेत. (१) तीन चार दिवस जर उपवास केला तर शरीरातील रसधातू नष्ट होईल आणि मृत्यु येईल. कारण रसधातूचे सर्वात्मना रक्तधातूत परिवर्तन होत असते. याप्रमाणे जर महिनाभर उपवास केला तर शरीरात फक्त शुक्रच उरेल. परंतु असे कोठे दिसत नाही. (२) दूध हे सद्यःशुक्रकर आहे, रसापासून रक्त-मांसादि अवस्थामधून जात असताना दुधाचे एवढ्या चटकन शुक्र होईल हे संभवत नाही. त्यामुळे या न्याया-विषयी शंका घेण्यास अवसर आहे. (३) जर रसदुष्टी झाली तर चार पाच दिवसात रक्तदुष्टीं व्हावयास हवी आणि याप्रमाणे एक महिनाभरात सर्वच धातू दुष्ट व्हावयास हवेत. पण तसे ते होत नाहीत. (४) मेदस्विनः मेद एवोपचीयते न तयेतरे धातवः' या वचनाशी हा न्याय विसंगत आहे. मेदस्वी मनुष्यात जर मेद वाढला तर अस्थिआदि धातूही, या न्यायानुसार वाढले पाहि-जेत. परंतु तसेहीं दिसत नाही. उलट इतर धातूंचा क्षयच आढळून येतो.

च. चि. १५।२०-३५ मध्ये क्रमपरिणामानुसार अग्निप्रवेशाचे प्रश्न आणि आचार्य आत्रेय पुनर्वसु यांच्या उत्तरांच्या स्वरूपात धातुपुष्टीचे प्रतिपादन आढळून येते. हे प्रकरण क्रमपरिणामवादाचा परमाधार होय.

परंतु काहींच्या मते हा सारा ग्रंथच प्रक्षिप्त आहे. कारण चक्रपाणीने त्याची व्याख्या केलेली नाही.

'इत्युक्तवन्तम्' इत्यादि: 'स्थलान्निम्नादिवोदकम् इत्यन्त पाठः चक्रपाणिदत्तेनाव्याख्यातत्वादनार्ष इति प्रतिभाति।

निर्णयसागरीय चरकसंहितेतील संपादकीय टिप्पण. चार दूषणे आणि वरील विवेचन यावरून क्रमपरिणाम-वादाचा किल्ला कोसळतो हे उघड आहे. सर्वच टीका-कारांनी हा प्रश्न त्याज्य ठरविला आहे आणि ते योग्यच आहे.

अंशांशपरिणामवादीला केदारीकुल्यान्यायाला ही चार दूषणे लागू पडत नाहीत. या पक्षानुसार प्रत्येक धातूचे स्थायी आणि अस्थायी असे दोन भाग पडतात. अस्थायी अंशापासून उत्तरधातूचे पोषण होते. हा अस्थायीअंश उत्तरधातुस्वरूपाप्रत जातो, स्थायी अंश मात्र अपरिणामी असतो. तो त्या त्या धातुरूपानेच शरीरात संचार करतो आणि पूर्वधातूच्या अंशांशापासून उत्तरधातूचे पोषण होते. क्रमपरिणाम पक्षावरील दूषणांचा या न्यायाच्या संदर्भात पुन्हा विचार करणे आवश्यक आहे. (१) सर्वात्मपरिणामातील ३–४ दिवसांच्या उपवासांनी रसक्षय होऊन मृत्यू येणे ही गोष्ट अंशांशपरिणामात संभवत नाही. ३–४ दिवसांच्या उपवासाने स्थायी अंशात काहीच फरक पडत नाही. (२) रसदुष्टीत रसाचा काही अंश तेवढा दुष्ट होतो रक्तपोषक रसांश हा त्यामुळे अदुष्ट राहू शकतो म्हणून रसदुष्टीने रक्तदुष्टी होणार अशी भीती बाळगण्याचे, अंशांशपरिणामानुसार, काहीच कारण नाही (३) मेदस्वीमनुष्यात अस्थिवृद्धी व्हावयास हवी असे नाही. हे आपणास अंशांशपरिणामात समजू शकते.

पृथक्परिणामवादी खलेकपोतन्याय अनुसरणारे विद्वज्जन अंशांशपरिणामात 'सद्यः शुक्रकरं पयः' इ. चे उत्तर मिळत नाही असे म्हणतात. खलेकपोतन्याया-नुसार रस वेगवेगळ्या मार्गांनी रक्तादि स्थानात जाऊन त्यांचे पोषण करतो. जवळच्या धातूचे पोषण लवकर आणि लांबच्या धातूचे पोषण उशीरा होते. दुध हे शुक्रपोषक आहे. ते स्वप्रभावाने चटकन् शुक्र-स्थानी जाऊन त्याचे पोषण करते. पृथक्परिणाम ही या न्यायातील विशेष कल्पना आहे. ज्या त्या धातूचे पोषक अंश हे इतर धातुपोषक अंशापासून भिन्न आहेत व वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. यामुळे रसदुष्टी झाली असता ज्या धातूचा पोषकभाग दुष्ट झाला असेल तेवढाच धातु दुष्ट होतो व बाकीचे धातु सुस्थितीत राहू शकतात, असे या न्यायावरूनही सांगता येते. मेदवृद्धी झाली असता अस्थिवृद्धी व्हावी हा आक्षेपही या न्यायात संभवत नाही.

राजयक्ष्माप्रकरणी 'रक्तं विबद्धमार्गत्वान्मांसादीन् नोपचते' असे जे चरकाने म्हणटले आहे, त्याचा आधार घेऊन काहीजण खलेकपोतन्यायावर आक्षेप ठेवतात. परंतु शिवदासाने त्याचे उत्तमप्रकारे खंडन केले आहे, त्याच्या म्हणण्याप्रमाणे चरकांना अभिप्रेत असलेले रक्त हे सर्वदेहचारी अथवा चक्राने म्हटल्याप्रमाणे हृदयचारी रक्त होय. ते स्थायी असते. स्थायी रक्त विबद्ध झाले म्हणून रसाच्या त्या त्या धातुपोषक अंशाच्या कार्यात कोणताच बाध येत नाही.

सुश्रुताने 'स खलु त्रीणि त्रीणि कलासहस्राणि' असेजे म्हटले आहे त्यामुळेही खलेकपोतन्यायावर आक्षेप येतो. रसधातू एका धातूत पाच दिवस राहून नंतर शेषरस पुढच्या धातूकडे जातो. याची संगति फक्त केदारीकुल्यान्यायानेच लावता येईल. शिवदासाने खलेकपोतन्यायावरील या आक्षेपाचे खंडन करताना पुढीलप्रमाणे विचार मांडले आहे.

'यत्तु–धात्ववावस्थानकालः उक्तः स पूर्वपूर्वरक्तादि धातुलंघनकालो विदूरगामिरसस्येति व्यवस्थाप्यते। शिवदासटीका.

'सद्यः शुक्रकर पयः' या वचनाचा आधार घेऊन केदारीकुल्यान्यायावर आक्षेप आणता येतो. परंतु त्याचे खंडनही होऊ शकते. खलेकपोतपक्षात वृष्यापासून उत्पन्न झालेला रस दूर असूनही प्रभावामुळे शीघ्र शुक्रवृद्धी करतो यापेक्षा केदारीकुल्यान्यायानुसार वृष्यापासून उत्पन्न झालेला रस रक्तादि धातूंप्रत चटकन जाऊ शकतो असे म्हणणे अधिक श्रेयस्कर आहे.

'पित्तोष्मणः स रागेण रसो रक्तत्वमृच्छति' असे जे सुश्रुतवचन आहे ते केदारीकुल्यान्यायावर आधारित असावे असे वाटते. कारण खलेकपोतपक्षात हे संभवत नाही.

अरुणदत्ताने मांडलेल्या एककालीन धातु पोषण पक्षामध्ये खलेकपोत पक्षापलिकडे फारसे नाविन्य दिसत नाही. कारण पृथक्परिणति या दोन्ही न्यायात

अंतर्भूत आहे. क्रमपरिणतिही दोघात अंतर्भूत आहे. खळचावरील कबुतरे एकाचवेळी उडाल्यानंतरच अंतरानुसार ती लवकर अथवा उशीरा पोहोचू शकतील. तर लांब अंतरावर जाणारे कबुतर आधी निघाले आणि जवळ अंतरावर जाणारे कबुतर उशीरा निघाले तर दोन्हीही कबुतरे एकाचवेळी पोहोचणे शक्य होते व क्रमपोषणास बाध येतो. तेव्हा खलेकपोत पक्षातही आहाररस हा एकाचवेळी सर्व धातुमार्गात फेकला जातो ही गोष्ट अंतर्भूत आहेच म्हणून एका लीनधातुपोषण न्यायाचा वेगळा विचार येथे करण्याचे काही कारण उरत नाही.

केदारीकुल्यान्यायावरील आणखी एका आक्षेपाचे शिवदासाने मोठ्या मार्मिकपणे खंडन केले आहे. तो म्हणतो, "काही लोक चरकातील संततज्वराची संप्राप्ति पुढे करून तो द्वादशाश्रयी आहे म्हणून खलेकपोतन्यायच योग्य आहे असे म्हणतात, ते आम्हास कळत नाही. कारण संततज्वराचे सप्तधातू, त्रिदोष व मूत्रपुरीष असे द्वादशाश्रयित्व सर्व देहव्यापक दोषमहिम्यामुळे आहे. दोष कुपित झाले म्हणजे संप्राप्तिवशात् कोठे जाऊ शकणार नाहीत? त्यांना सर्व धातू दूषित करण्यास रसाची काय जरूरी आहे? "

आधुनिक वैद्यकाचा अभ्यास करणाऱ्या कोणासही शरीरात वेगवेगळ्या धातूंची वेगवेगळी स्त्रोतसे आहेत असा विचार सहजपणे मान्य होणार नाही. प्रत्येक धातूच्या वेगळ्या स्त्रोतसाचे अस्तित्व शवविच्छेदनात दिसून येत नाही. 'तर्काने काही गोष्टी मानून घ्याव्यात' ही गोष्ट जरी ठीक असली तरी प्रत्यक्षात काहीच दिसत नसताना ती गोष्ट तेथे आहे असे मानणे मानवणारे नाही.

चक्रदत्ताने 'खलेकपोतन्याय व केदारीकुल्या न्याय हे तुल्य व महाजनांनी आदरीत असल्याने बुद्धिसामर्थ्याने त्यांचे बलाबल ठरविता येत नाही' असे म्हटले आहे शिवाय दोन्ही पक्ष मानल्यास कार्यविरोध उत्पन्न होत नाही असे म्हटले आहे, याच चक्रदत्ताने च. चि. १५।१६ वरील टीकेत केदारीकुल्यान्याय व क्षीरदधिन्याय संगत असल्याचे सांगून 'खलेकपोतन्यायस्तु मनाग्दुर्घटः' असे म्हटले आहे. त्याच्या च. सू. २८ ४ वरील टीकेंत आणि या टीकेत विसंगति आहे. तरीही केदारीकुल्यान्यायच त्यास पसंत असल्याचे दिसते.

शिवदासानेही 'स्वरसस्तु अस्माकं केदारीकुल्यान्याये' असे म्हटले आहे. डण्हणासही केदारीकुल्यान्यायच पसंत असल्याचे दिसते. सु सू. १४।१० वरील आपल्या टीकेत त्याने पुढील प्रमाणे लिहीले आहे.

'तेन रसात् क्रमोत्पत्त्या शोणितमेव भवति नापरेधातव इति । एतेन युगपदेव सर्वधातुषु रससंचाराद्रसे नैव धातुपोषणम् इति तत्रांतरीयं वचो निस्तरम् । –'

या प्रमाणे केदारीकुल्यान्याय हाच सर्वात योग्य असल्याचे दिसून येईल.

## समारोप

चतुर्विधन्यायांचे परीक्षण येथवर केले. यांपैकी केदारीकुल्यान्याय हाच सर्वात श्रेयस्कर असल्याचेही सांगितले. कारण क्षीरदधिन्याय हा उघडउघड बाजूला पडतो. एककालपरिणामपक्ष हा बहुतांशी खलेकपोतपध्नातच अंतर्भूत आहे. खलेकपोतन्यायातील रसाच्या शुक्रधातूत परिवर्तन होणाऱ्या अंशामध्ये पहिल्या पंचवीस दिवसापर्यंत काहीच बदल होऊ नये हे जरा विचित्रच वाटते. शिवाय मागे म्हटल्याप्रमाणे वेगवेगळ्या स्त्रोसांच्या अस्तित्वाविषयी प्रत्यक्ष प्रमाण दिसत नाही. उगाच तर्काने कोणतीतरी गोष्ट मांडायची आणि तीच खरी आहे असे म्हणावयाचे हे समजत नाही.

प्राचीन वैद्यकशास्त्राने अनेक वाद आपल्या पोटी दडवून ठेवले आहेत. त्यापैकीच हा एक वाद आहे. धातुपरिणती कोणत्याही न्यायाने होवो ती एका विशिष्ट क्रमाने होते, या विचाराला अधिक प्राधान्य द्यावयास हवे. रसानंतर लगेच मज्जाधातु उत्पन्न झाला असे आढळत नाहीत. धातूंच्या उत्पत्तीक्रमाविषयी आयुर्वेदाचा हा जो सर्वतंत्र सिद्धांत आहे तोच अधिक महत्वाचा आहे.

●●●